


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २३२, शुक्रवार ३१ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मला भाजपासह सर्वपक्षीयांची मदत!

## ■ नीलेश लंके यांचा गौप्यस्फोट ■ आकसबुध्दीचे राजकारण करणारांचा हिशेब चुकता करू ■ शेवगांव येथे राजेंद्र दौंड यांचा अभिष्टचिंतन सोहळा



■ शेवगांव येथे राजेंद्र दौंड यांच्या अभिष्टचिंतन सोहळयात नीलेश लंके यांनी विखे-पिता पुत्रांवर नाव न घेता टिकास्त्र सोडले.

शेवगांव : बाळासाहेब खेडकर

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत भाजपासह सर्वपक्षीय नेते, कार्यकत्यांनी मला मदत केल्याचा गौप्यस्फोट करीत मी सर्वपक्षीय कार्यकर्ता असल्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी सांगितले.**

शेवगांव थेथे युवा नेते राजेंद्र दौंड यांच्या अभिष्टचिंतन सोहळयास उपस्थित राहुन नीलेश लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, खा. डॉ. सुजय विखे यांचे नाव न घेता जोरदार टीकास्त्र सोडले.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, लोकसभा निवडणूकीचे मतदान झाल्यानंतर सत्ताधारी भाजपाचे पदाधिकारी आकसबुध्दीचे राजकारण करू लागले आहेत. आमच्या कार्यकर्त्यांवर खोटे नाटे गुन्हे दाखल करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. त्यांनी अकासबुध्दीतून गुन्हे दाखल करू नयेत. अन्यथा दि. ४ जुन रोजी लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर सर्व हिशेब चुकता केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही असा इशारा लंके यांनी विखे पिता-पुत्रांचे नाव न घेता दिला.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते तथा केदारेश्वर कारखान्याचे माजी अध्यक्ष प्रतापकाका ढाकणे, शिवशंकर राजळे, ज्येष्ठ नेते दिनकर पालवे, शिवसेना नेते रामदास गोल्हार, रफीक शेख, केदारेश्वर कारखान्याचे संचालक श्रीमंत गव्हाणे, गहिनीनाथ शिरसाट, भाजपाचे बंडू रासणे, शेवगांव बाजार समितीचे सभापती एकनाथ कसाळ, युवा नेते नंदकुमार मंडे, शिरीष काळे, बोधेगांवचे उपसरपंच संग्राम काकडे, मयुर हुंडेकरी, बालमटाकळीचे उपसरपंच घोरपडे, एकनाथ शिंदे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख साईनाथ आधाट, नामदेव कसाळ, वंचित आघाडीचे उमेदवार दिलीप खेडकर, नवनाथ खेडकर यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

### जनतेचे काम करणारास पाठबळ

इंग्रजी बोलून दाखविण्याचे आव्हान लोकसभा निवडणूकीच्या प्रचारादरम्यान मला देण्यात आले होते. मात्र जनतेला इंग्रजी बोलणाराऐवजी काम करणारा खासदार हवा होता. जनतेने काम करणा-या उमेदवारास पाठबळ दिले. माझे इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाले नाही. मी आयटीआय करून साधा फिटरचा कोर्स केलेला आहे. त्यामुळे कोणता पान्हा कसा लावायचा याचा खटका मला माहीती आहे. तो खटका मी जुळविला असून निकालानंतर सर्व काही तुमच्यासमोर येईल असे लंके यांनी सांगितले.

### मोठया मताधिक्क्याने विजयी होणार

यावेळी बोलताना लंके म्हणाले, पैसे कमविण्यापेक्षा जीवाभावाची माणसं सोबत असली तर जीवनात काही कमी पडत नाही. मी प्रस्थापितांच्या विरोधात सामान्य जनतेला नेहमीच भरीव मदत केली आहे. प्रस्थापितांच्या विरोधात माझी लढाई सुरू आहे. चार पिढयांपासून राजकारण करणारांविरोधात लोकसभेची लढाई करणे सोपे काम नव्हते, परंतू जीवाभावाचे सहकारी, सर्वसामान्य मतदार व सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी मला या निवडणूकीत भरीव मदत केली. त्यामुळे या निवडणूकीत आपण मोठया मताधिक्क्याने विजयी होणार असल्याचे लंके यांनी ठामपणे सांगितले.

### लंके यांनी सस्पेन्स कायम ठेवला

मला भाजपासह सर्वच पक्षातील अदृश्य राजकीय शक्तींनी तन, मन, धनाने मदत केली. सर्वसामान्य गोगरीब जनतेनेही मला निवडणूकीसाठी आर्थिक मदत केली. राजकीय मदत कोणी कोणी केली हे मी आताच जाहिर करणार नाही, मात्र ज्यावेळी निकाल जाहिर होईल त्यावेळी सर्व चित्र स्पष्ट होईल असे सांगत लंके यांनी अदृश्य शक्तींबाबतचा सस्पेन्स कायम ठेवला.

### कोण चालवतंय पोलीस, महसूल यंत्रणा?

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून होत असलेल्या सत्तेच्या गैरवापरावर लंके यांनी टीकास्त्र सोडले. महसूल व पोलीस यंत्रणा कोण चालवतंय हे पहावे लागेल असे सांगतानाच शेवगांव तालुक्यात सर्वसामान्य कार्यकर्त्यांवर खोटे-नाटे गुन्हे दाखल करण्याचे उद्योग निवडणूकीनंतर सुरू झाले आहे. मात्र आपण सर्वसामान्य कार्यकर्त्यांवर अन्याय होऊदेणार नाही अशी ग्वाही लंके यांनी यावेळी बोलताना दिली.

# राजे शिवाजी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हे दाखल करा

## शेकडो ठेवीदारांची पोलीस निरीक्षकांकडे मागणी



■ राजे शिवाजी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे निवेदन पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना देण्यात आले.

पारनेर : प्रतिनिधी

**कान्हूरपठार येथील राजे शिवाजी पतसंस्थेच्या संचालक मंडळाविरोधात ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी संस्थेच्या शेकडो ठेवीदारांनी बुधवारी पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राजे शिवाजी पतसंस्थेकडे तालुक्यातील हजारो ठेवीदारांच्या ठेवी आहेत. सुमारे १०० कोटींच्या ठेवी संस्थेकडे असून संचालक मंडळाने ठेवीदारांना विश्वासात घेऊन ठेवींवर जादा व्याजदर देण्याचे आमिष दाखवून ठेवी जमा केल्या आहेत. संस्था अतिशय मजबुत आहे. संस्था मोठी आहे. संस्थेची फार मोठी गुंतवणूक आहे. संस्थेचे स्वत:चे मोठे भागभांडवल आहे. मोठी मालमत्ता आहे अशी खोटी प्रलोभने दाखवून ठेवीदारांना आकर्षित केले.

गेल्या आठ, दहा महिन्यांपूर्वी संस्थेमध्ये गैरव्यवहार झाल्याची चर्चा सुरू झाली. संस्थेचे अध्यक्ष आझाद ठुबे यांनीच संस्थेकडून विनातारण व बेकायदेशीर कोटयावधी रूपयांची कर्जे उचलल्याचे लेखापरिक्षणावरून उघड झाले. ठेवीदारांनी संस्थेकडे ठेवींच्या सुरक्षिततेविषयी विचारणा केली असता कोणत्याही प्रकारचा घोटाळा झालेला नाही. सर्व ठेवी सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले.

अधिक चौकशी करण्यात आली असता संचालक मंडळाने बेकायदा कर्ज उचल करून परतफेड केली नाही. शिवाय ही कर्जे सुरक्षित नाहीत त्यातून संस्था आजारी पडल्याची माहीती पुढे आल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

संस्थेकडे वेळोवेळी आमच्या ठेवी, बचत खात्यावरील रक्कम मिळावी याची मागणी करण्यात आली, मात्र ठेवी अथवा बचत खात्यावरील रक्कम मिळाली नाही. संस्थेचे संचालक मंडळ, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी संचालकांनी ठेवी परत करण्यास नकार दिला. कर्ज वसुल होईल, त्यावेळी ठेवी मिळतील असे बेजबाबदार उत्तर त्यांच्याकडून देण्यात येत असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

### लेखापरीक्षकाचे पाठबळ

संस्थेचे लेखापरीक्षण करणारे लेखापरीक्षक यांनी देखील गेल्या काही वर्षांपासून या संस्थेत होत असलेल्या गैरव्यवहाराला संरक्षण व पाठबळ दिले आहे. त्यामुळे या संस्थेचे लेखापरीक्षकही या अपहारास जबाबदार असल्याचे ठेवदारांचे म्हणणे असून त्यांच्याविरोधातही तक्रार करण्यात आली आहे.

### बेनामी मालमत्ता घेतल्या

संस्थेच्या संचालक मंडळाने अपहराच्या रकमेतून बेनामी मालमत्ता विकत घेतल्या. करचुकवेगिरी, सावकारी, काळा पैसा पांढरा करणे असे गंभीर गुन्हे स्वरूपाचे गुन्हे केल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

### चेअरमनकडून दिशाभुल

लवकरच संस्थेवर अवसायकाची नियुक्ती होईल. आपल्या ठेवी मिळविण्यासाठी संचालक मंडळावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा लागेल. १९९९ मध्ये ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करणारा कायदा संमत झाला आहे. चेअरमन गुन्हा दाखल करू नका असे सांगत आहेत. मात्र ही दिशाभूल आहे.

ॲड. रामदास घावटे

### सहकाराची स्थिती भयानक

पारनेर तालुक्यात सहकाराची स्थिती भयानक आहे. साखर कारखाना, दुध संघ, खरेदी विक्री संघ अनेक पतसंस्थांचे वाटोळे झाले आहे. केवळ राजकारण हे त्यामागचे कारण असल्याचे ॲड. रामदास घावटे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### स्व. ठुबेंच्या चिरंजीवाने बेईमानी केली

अंध विश्वासाने ठेवी ठेवल्या होत्या. बाबासाहेब ठुबे प्रामाणिक व्यक्तीमत्व होते. त्यांचा चिरंजीव बेईमानी करणार नाही असा सर्वांचा समज होता. कष्टाचे पैसे या संस्थेत ठेव म्हणून ठेवली. मात्र चिरंजीवाने विश्वासघात केला.

ॲड. रामदास घावटे

### चेअरमन, नातलगांकडे कोटयावधी रूपये

दिड वर्षापूर्वी आम्ही राजे शिवाजीविरोधात तक्रार केली होती. त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही त्यामुळे ही परिस्थिती उदभवली आहे. चेअरमन व त्याच्या नातेवाईकांकडे तीस ते चाळीस कोटी रूपये आहेत. त्यामुळे संस्था अडचणीत आली असल्याचा आरोप रामदास घावटे यांनी केला.

# कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन सुटले

## मा. आ. नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यास यश

पारनेर : प्रतिनिधी

**कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन जलसंपदा विभागामार्फत गुरूवार दि. ३०रोजी दुपारी चार वाजता उन्हाळी आतर्वन सोडण्यात आले. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मा. आ. नीलेश लंके यांनी जलसंपदा विभागाच्या अधिक्षक अभियंत्यांकडे पाठपुरावा केला होता.**

पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने शेतामधील विशेषत: जनावरांच्या चाऱ्याची पिके, फळबागा, इतर शेतमाल जळण्याची भिती निर्माण झाली होती.



पिण्याच्या पाण्याचेही संकट उभे राहिले होते. या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांनी मा. आ. नीलेश लंके यांच्याकडे मागणी करून शेवटचे उन्हाळी आवर्तन सोडण्याची आग्रही मागणी केली होती. कुकडी प्रकल्प सल्लागार समितीचे सदस्य सचिव तथा अधिक्षक अभियंत्यांकडे मा. आ. नीलेश लंके यांनी पत्रव्यवहार करून शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले उर्वरीत पान ३ वर

### म्हणून आवर्तनास उशिर

कुकडी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या धरणांमधील पाणीसाठी अत्यल्प आहे. त्यामुळे सर्व धरणांचे पाणी एकत्र करून ते सोडण्याचा अधिकाऱ्यांनी निर्णय घेतला. पाणी एकत्रीकरणास वेळ लागल्याने हे आवर्तन सोडण्यास उशिर झाल्याचे सांगण्यात आले. लंके यांनी हे आवर्तन २५ मे रोजी सोडण्याची मागणी केली होती. त्यावर जलसंपदा विभागाकडून हा खुलासा करण्यात आला आहे.

# सुप्यातील अतिक्रमणधारकांना ३० मे चा अल्टिमेटम

## प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

सुपा : प्रतिनिधी

**नगर-पुणे व सुपा-पारनेर महामार्गावरील अतिक्रमणे काढून घेण्याबाबत प्रशासनाने अतिक्रमणधारकांना ३० मे चा अल्टिमेटम देण्यात आला असून आता प्रशासन काय भूमिका घेणार याकडे सुपे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.**

शनिवार दि. २५ मे रोजी प्रशासनाने कारवाई करून सुमारे १५० हून अधिक अतिक्रमणे भुईसपाट केली. काही अतिक्रमणधारकांनी न्यायालयात जाऊन ३० मे पर्यंत मुदत मिळविली होती. तर काही अतिक्रमण धारकांनी आम्ही स्वत: अतिक्रमण काढून घेतो, ३० मे पर्यंत मुदत देण्याची मागणी केली होती. त्यांनाही मुदत देण्यात आली असून ३० मे अखेर ही अतिक्रमणे काढली गेली नाही तर त्यांच्यावर कारवाई अटळ असल्याचे सांगितले जाते.




### नारायणगव्हाणचे चौपदरीकरण कधी ?

सुप्यातील अतिक्रमणे काढताना प्रशासनाने तत्परता दाखविली असताना याच नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील अतिक्रमणे काढण्याबाबत प्रशासनाच्या भूमिकेकडे तेथील गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. चेतक एंटरप्राईजेसच्या वतीने या महामार्गाचे काम करण्यात आले. नारायणगव्हाण येथील रस्ता अरूंद आहे. तेथील वळणावर अनेकदा अपघात झाले त्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला, काहींना अपंगत्व आले. हा रस्ता चौपदरी करावा यासाठी ग्रामस्थ, विविध संघटनांनी अनेकदा आंदोलने केली मात्र अद्यापही हे काम पुर्णत्वास गेले नाही. त्यामुळे सुप्यातील अतिक्रमणांच्या तत्परतेप्रमाणेच नारायणगव्हाणच्या चौपरदीकरणाचे काम मार्गी लावण्याची मागणी पुढे आली आहे.






# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या




# लॅपटॉप मांडीवर ठेवून वापरता ?

**आजकाल बहुतेक लोक लॅपटॉपवर काम करू लागले आहेत. घरूनच काम केले तर लॅपटॉप लोकांच्या मांडीवरच मिळतात. तथापि, लॅपटॉप आपल्या मांडीवर घेऊन काम करणे खूप धोकादायक ठरू शकते. यामुळे तुम्हाला आजारही होऊ शकतो. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. या लेखात आम्ही तुम्हाला लॅपटॉप मांडीवर ठेवल्याने चालविण्याचे काय तोटे आहेत ते सांगणार आहोत...**


- लॅपटॉपमधून इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन निघतात : लॅपटॉप वापरताना त्यातून इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन बाहेर पडतात. तथापि, लॅपटॉपमधून उत्सर्जित होणारे रेडिएशन वाय-फाय आणि ब्लूटूथपेक्षा कमी आहे. पण जेव्हा तुम्ही ते तुमच्या मांडीवर ठेवता तेव्हा हे रेडिएशन शरीराच्या थेट संपर्कात येते. यामुळे तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.
- लॅपटॉप मांडीवर ठेवण्याचे हानिकारक परिणाम : जर तुम्ही तुमच्या मांडीवर लॅपटॉप घेऊन जास्त वेळ काम करत असाल तर त्यामुळे तुमच्या मणक्याला त्रास होऊ शकतो. याचा मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. काही अहवाल असे सूचित करतात की यामुळे टोस्टेड स्किन सिंड्रोम देखील होऊ शकतो. याशिवाय शरीराची मुद्राही बिघडते.

## या ६ गोष्टी लक्षात ठेवा...

- तुम्ही तुमचा लॅपटॉप नेहमी अपडेट ठेवला पाहिजे. लॅपटॉपचे सर्व प्रोग्राम्स, ऑपरेटिंग सिस्टीम आणि व्हायरस सुरक्षा सॉफ्टवेअर अपडेट ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.
- लॅपटॉप वापरताना वायरलेस माऊस आणि कीबोर्डचा वापर केल्यास लॅपटॉप वापरणे खूप सोपे होईल.
- लॅपटॉप खूप पोर्टेबल असतात. त्यामुळे लॅपटॉपची स्क्रीन तुम्हाला हवी तितकी मोठी आहे याची खात्री करून घ्यावी लागेल. यामुळे तुम्हाला स्क्रीनवर मजकूर आणि वस्तू पाहण्यासाठी जास्त ताण सहन करावा लागणार नाही. तसेच मजकूरही सहज वाचता येईल.



- लॅपटॉप नेहमी सपाट पृष्ठभागावर वापरावा. बहुतेक लॅपटॉपमध्ये बाजूंच्या किंवा तळाशी एअर व्हेंट्स असतात. तुम्ही तुमचा लॅपटॉप उशी किंवा पलंग सारख्या असमान पृष्ठभागावर जास्त काळ ठेवल्यास, तो जास्त गरम होतो. अशा स्थितीत लॅपटॉप नेहमी सपाट जागेवर ठेवावा.
- लॅपटॉपचे व्हेंट नेहमी स्वच्छ ठेवावेत. त्यामध्ये धूळ साचते आणि ते अडकते. यामुळे लॅपटॉप गरम होतो. कारण गरम हवा बाहेर जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, वेळोवेळी ते स्वच्छ करणे खूप महत्वाचे आहे.
- कूलिंग पॅड वापरणे हा देखील एक चांगला पर्याय असू शकतो. तुम्ही तुमच्या लॅपटॉपसाठी कूलिंग पॅड देखील वापरू शकता. हे केवळ तुमचा लॅपटॉप चांगल्या स्थितीत ठेवणार नाही, तर तुमच्या लॅपटॉपचा तळही थंड करेल.



# सेफनेट उद्देश साध्य करण्यासाठी...

**इंटरनेट हाताळताना आपल्या मुलांवर वॉच ठेवण्यासाठी सेफनेट हे ॲप येणार आहे. मात्र, हे ॲप फायदेशीर ठरण्याऐवजी त्याच्या वापरावरच अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.**

मुलांचा वाढता स्क्रिन टाइम हा सर्वच पालकांसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. प्रामुख्याने ऑनलाइन शिक्षणावर भर दिला जात असल्याने पालकांना मुलांसाठी इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागत आहे. अशा स्थितीत काहीवेळा इंटरनेटचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. परिणामी त्यांच्या ऑनलाइन घडामोडींवर देखरेख करण्यासाठी ॲप किंवा संकेतस्थळ आणण्याचे प्रयत्न होत असले तरी इंटरनेटच्या मायाजालमधून त्यांना कितपत वाचवता येईल, हा प्रश्न आहेच. अर्थात त्यादृष्टीने टाकण्यात येणारे पाऊल हे कौतुकास्पद आहे. अलीकडच्या एका अहवालानुसार, भारतात इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय सध्या 'सेफनेट' ॲपवर काम करत असून तो ॲप पालक आणि पाल्य यांच्या फोनमध्ये कनेक्टिव्हिटी ठेवण्याचे काम करणार आहे. याप्रमाणे मुलांच्या ऑनलाइन ॲक्टिव्हिटी पालकांपर्यंत पोहोचू शकतील. अशा प्रकारचे देखरेख करणारे ॲप किंवा संकेतस्थळ सुरू करण्याची परवानगी दिल्यानंतर मुले कितीकाळ ऑनलाइन राहतात, हे तपासण्याची व्यवस्था असेल. त्याचवेळी सेफनेट हे यूट्यूबसारख्या साइटवर दाखविण्यात येणाऱ्या सामग्रीची माहिती देण्याबरोबरच कॉल डिटेल्स आणि मेसेजदेखील शेअर करेल, असे म्हटले जात आहे. 'इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर असोसिएशन ऑफ इंडिया' यांनी मात्र हे ॲप सर्व ग्राहकांच्या फोनमध्ये डिफॉल्ट रूपात असायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मुलांची ऑनलाइन सुरक्षा हा कळीचा मुद्दा आहे आणि इंटरनेटच्या अतिवापरामुळे मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. अर्थात मुलं इंटरनेटचा वापर कसा करतात, कशासाठी करतात आणि का करतात, यानुसार त्यांच्या प्रभावाचे आकलन करायला हवे. मात्र धोरणकर्त्यांच्या मते, प्रत्यक्षात दैनंदिन जीवनाप्रमाणेच आभासी जगातही लक्ष ठेवण्याचे पालकांनी कर्तव्य बजावले पाहिजे.

## या बाबींचा विचार हवाच!

- पहिली म्हणजे वास्तविक जगातही पालक मुलांपर्यंत पोचणाऱ्या सर्व माहितींवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. एखादी गोष्ट किंवा घटना मुलांना कशी कळाली, हे ऐकून काहीवेळा पालकांनाच आश्चर्याचा धक्का बसतो. कारण मुलांच्या मित्रांत सुरू असलेल्या चर्चेपासून पालकमंडळी अनभिज्ञ असतात. अशा स्थितीत ऑनलाइन जगात पालकांनी मुलांच्या सक्रियतेला लगाम घातला तर संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता अधिक राहू शकते. बालमानसोपचार तज्ज्ञांच्या मते, पालकांचे लक्ष आणि मुलांची स्वायत्तता यांच्यात पुसटशी रेषा असून ती ओळखणे गरजेचे आहे.
- दुसरा मुद्दा म्हणजे, खासगीपणा, गोपनीयतेवर हल्ला करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांचा दुरुपयोग होण्याची शक्यता अधिक असते. विशेषतः आपल्याच कुटुंबात सापत्न व्यवहाराचा सामना करणाऱ्या मुलांसाठी ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५' नुसार भारतात एकतृतीयांश महिला आपल्या जोडीदाराकडून कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात. अशावेळी पत्नीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बरीच मंडळी या उपकरणांचा वापर करू शकतात. एवढेच नाही तर या माध्यमातून मुलांच्या तुलनेत मुलींच्या दैनंदिन जीवनावर देखील नियंत्रण मिळवले जाऊ शकते.



- 'यंग लीडर्स फॉर ॲक्टिव्ह सिटीझनशिप'च्या एका सर्वेक्षणानुसार ८० टक्के पालक हे इंटरनेटवर अधिक वेळ घालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इंटरनेटवर काही अडल्यास तेच मुलांची मदत घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. आजकाल पालक स्वतःच 'रील'मध्ये आकंठ बुडालेले असतात, तर मग मुलांवर लक्ष कोण ठेवणार?

## मुले पुढाकार घेतील असे काहीतरी करणे गरजेचे...

मुलांची ऑनलाइन सुरक्षा सुनिश्चित करताना अनेक समस्यांचा जन्म होऊ शकतो. त्यामुळे सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला सर्वात अगोदर कायद्यात सुधारणा करावी लागेल. उदाहरणार्थ, आयटी अधिनियम २००० ची जागा घेणाऱ्या नव्या भारतीय कायद्यात ब्रिटनच्या एज अप्रोपिएटड डिझाइन कोड (ज्याला आपण मुलांची संहिता म्हणतो) आणि 'द ओटिरोवा न्यूझीलंड कोड ऑफ प्रॅक्टिस फॉर ऑनलाइन सेफ्टी अँड हार्म्स' या सारख्या नियमांची तरतूद हवी. दुसरे म्हणजे पूर्वीपासूनच उपलब्ध असलेल्या नियंत्रण उपकरणांना अधिक सक्षम करण्यासाठी ऑनलाइन घडामोडी, व्यवहार निश्‍चित करावे लागतील. तिसरे म्हणजे आपण शिक्षण संस्थांना देखील या घडामोडीत सामील करून घेणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात पालक हे मुलांच्या 'स्क्रिन टाइम'वरून चिंतित असतात आणि यासंदर्भात धोरण आखताना पुनर्विचार करणे गरजेचे आहे. अर्थात, सध्याच्या काळात मुलांचा स्क्रिन टाइम लक्षणीय वाढला आहे. चौथी गोष्ट म्हणजे, कोणताही मार्ग किंवा सल्ला हे मुलं मोकळ्या मनानं स्वीकारणार नाहीत, याची जाणीव सर्व शिक्षक आणि पालकांना असते. कारण मुले इंटरनेट वापराबाबत अधिक कुशल असतात आणि ते रचनात्मक पातळीवर वापर करत असतात. म्हणून मुलांनी स्वतःच सायबर किंवा ऑनलाइन सुरक्षेबाबत पुढाकार घ्यावा, या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत.

# नेटफ्लिक्सचा पुन्हा धक्का! जूनपासून हे फीचर होतेय बंद, मासिक खर्च वाढणार

**नेटफ्लिक्सवरील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य (फिचर) बंद केले जात आहे. ज्यामुळे तुमचा दैनंदिन डेटा खर्च वाढू शकतो. त्यामुळे तुमच्या मासिक खर्चातही वाढ होईल. याविषयी सविस्तर जाणून घेऊया...**

यापूर्वी, नेटफ्लिक्सने पासवर्ड शेअरिंग फीचर बंद केले होते. ज्यामुळे वापरकर्त्यांना त्यांचे नेटफ्लिक्स सबस्क्रिप्शन घेणे भाग पडले होते. अशा परिस्थितीत अनेक नेटफ्लिक्स युजर्सचा त्रास वाढला होता. आता Netflix ऑफलाइन व्हिडिओ डाउनलोड फीचर बंद करत आहे.

- काय नुकसान होईल? : हे फीचर बंद झाल्यानंतर युजर्सच्या मोबाईल डेटाचा वापर वाढणार आहे. आतापर्यंत वाय-फाय रेंज असताना वापरकर्ते नेटफ्लिक्स ॲपमध्ये चित्रपट आणि शो डाऊनलोड करायचे आणि वाय-फाय नसताना इंटरनेटशिवाय चित्रपट आणि शो पाहायचे. पण आता नेटफ्लिक्स तुम्हाला वाय-फाय रेंजच्या बाहेर असताना मोबाइल डेटा वापरावा लागेल. अशा परिस्थितीत डेटा खर्च वाढेल.
- कोणते वापरकर्ते प्रभावित होतील? : अहवालानुसार, नेटफ्लिक्स विंडोज १० आणि विंडोज ११ वापरकर्त्यांना व्हिडीओ डाउनलोड करण्याची परवानगी देणार नाही. पूर्वी १०८० पिक्सेल म्हणजेच फुल एचडी व्हिडिओ डाऊनलोड करू शकत होते. तथापि, वापरकर्ते मोबाइल आणि टॅबलेट डिव्हाइसवर टीव्ही शो आणि चित्रपट ऑफलाइन पाहू शकतील.
- जाहिराती लवकरच दिसतील : नेटफ्लिक्स ॲपच्या नवीन अपडेटनंतर वापरकर्ते स्वस्त रिचार्जवर जाहिरातींसह चित्रपट आणि शो पाहू शकतील. या योजनेत व्यावसायिक ब्रेक असतील. सध्या भारतात कोणतीही जाहिरात समर्थित सामग्री उपलब्ध नाही.


# मोबाईलवरून डिलीट झालेले संपर्क क्रमांक कसे परत आणायचे?

**तुम्हाला माहिती आहे का, तुमच्या मोबाईलमध्ये सेव्ह केलेले कॉन्टॅक्ट थेट क्लाउडवर स्टोअर केले जातात. वास्तविक Google One सेवा Google द्वारे ऑफर केली जाते. पण जीमेल वापरकर्त्यांना १५ जीबी फ्री क्लाउड स्टोरेज दिले जाते. तुमच्या अँड्रॉइड स्मार्टफोनचे कॉन्टॅक्ट्स इथे सेव्ह केले जातात.**


तुमच्या मोबाईल क्रमांकावरून संपर्क क्रमांक गायब झाल्यास कोणीही काळजी करू शकते. वास्तविक, अशी अनेक प्रकरणे पहायला मिळत आहेत जिथे कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये सेव्ह केलेले नंबर गायब होत आहेत.

### गहाळ संपर्क परत कसे मिळवायचे...

आम्ही तुम्हाला सांगतो की जर एखाद्याने तुमच्या Gmail वरून कॉन्टॅक्ट डिलीट केला असेल तर तो थेट डिलीट होत नाही. या सर्व संपर्क सूची रिसायकलिंग बिनमध्ये आहेत, जिथून ते पुनर्प्राप्त केले जाऊ शकते.



वास्तविक हे गुगलच्या मालकीच्या जीमेलमुळे होत आहे. अलीकडे, अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ज्यात हॅकर्स आपल्या जीमेलचा ॲक्सेस घेतात. यानंतर, तुमच्या जीमेलमध्ये सेव्ह केलेले कॉन्टॅक्ट डिलीट केले जातात, ज्यामुळे तुमच्या फोनमधून मोबाईल नंबर गायब होतात. वास्तविक तुमची संपर्क यादी तुमच्या जीमेल खात्याशी जोडलेली असते.




याच कारणामुळे तुम्ही तुमचे जीमेल खाते इतर कोणत्याही मोबाइलमध्ये लॉग इन करताच तुमचे सर्व संपर्क आणि Google ड्राइव्हमध्ये सेव्ह केलेले फोटो, व्हिडिओ आणि कागदपत्रे त्या मोबाइलवर पोहोचतात. अशा परिस्थितीत पहिली अट म्हणजे तुमच्या जीमेलची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्वप्रथम तुम्ही जीमेलमध्ये टू फॅक्टर ऑथेंटिकेशन चालू केले पाहिजे. तसेच पासवर्ड वेळोवेळी बदलला पाहिजे.



# ५ स्टार की 3 स्टार?


## घरासाठी एसी घेताना या गोष्टी लक्षात ठेवा...

**विंडो एसी किंवा स्प्लिट एसी खरेदी करताना तुम्हाला सर्वात मोठी समस्या भेडसावत असते की कोणता एसी घ्यायचा? आज आम्ही तुम्हाला ३ स्टार आणि ५ स्टार एसीमधील फरक समजावून सांगणार आहोत. यानंतर तुम्हाला समजेल की वीज किती वाचवता येते.**

पावसाळा तोंडावर आला तरी ऊन कमी घेण्याचे नाव घेत नाहीये. वाढत्या उकाड्यामुळे अनेक जण एसी घेण्याचा विचार अजूनही करत आहेत. तुम्हीही एसी घेण्याचा विचार करत असाल तर आम्ही तुम्हाला काही गोष्टी सांगणार आहोत. ३ स्टार आणि ५ स्टार असे दोन प्रकारचे एसी सध्या बाजारात उपलब्ध आहेत. नवीन एसी घेण्यापूर्वी या दोन्हींमधील फरक देखील जाणून घ्या. डायकिन कंपनीने आपल्या वेबसाइटवर दोन एसीमधील फरक स्पष्ट केला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, जर एखाद्या ग्राहकाने ३ स्टार एसीच्या तुलनेत ५ स्टार एसी खरेदी केला तर विजेची मोठी बचत होणार आहे. याशिवाय ५ स्टार एसी सुद्धा जास्त कूलिंग देतो असे कंपनीचे म्हणणे आहे. यामुळे तुम्हाला दोन्ही एसींमध्ये कोणतीही अडचण येणार नाही. पण एका निर्णयाने सर्व काम सोपेही होऊ शकते.

### किती वीज वाचवते?

डायकिनच्या मते, ३ स्टारच्या तुलनेत ५ स्टार २८ टक्के विजेची बचत करते. कंपनीने यासंबंधीचा डेटा देखील शेअर केला आहे जो दर्शवितो की दोन्ही AC च्या पॉवर सेव्हिंग क्षमतेमध्ये किती



फरक आहे. याचा अर्थ असा की जर तुम्ही ५ स्टार एसी घेतला तर तुम्हाला थोडे जास्त पैसे द्यावे लागतील, पण त्यानुसार विजेचीही बचत होते. ३ स्टार एसीच्या तुलनेत, ५ स्टार एसी १९३ वॅट्स कमी वीज वापरतो. ३ स्टार एसी ७४७ वॅट पॉवर वापरतो तर ५ स्टार एसी ५५४ वॅट पॉवर वापरतो. याचा अर्थ कमी वीज वापर असूनही तुम्हाला उत्कृष्ट कूलिंग मिळते. अशा परिस्थितीत ५ स्टार एसी खरेदी करणे तुमच्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते. दोन्ही एसीच्या किमतीत ५ ते १० हजार रुपयांची तफावत आहे.

## शॉर्ट न्यूज

### संतप्त झालेल्या ग्रामस्थांचे रस्तारोको आंदोलन

**राहुरी :** तालूक्यातील गोटूंबे आखाडा येथे सायंकाळ दरम्यान गयाबाई गंगाराम तमनर, वय ४२ वर्षे, या रस्ता ओलांडत होत्या. तेव्हा भरधाव वेगात आलेल्या एका चारचाकी वाहनाने गयाबाई तमनर यांना जोराची धडक दिली. त्यांना तातडीने रुग्णालयात नेले असता त्या मयत झाल्या. गोटूंबे आखाडा येथील ग्रामस्थ एक वर्षांपासून गतीरोधक बसविण्याची मागणी करीत होते. मात्र त्या ठिकाणी गतीरोधक नसल्याने सदर अपघात झाला. असा आरोप करून संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अचानक रस्तारोको आंदोलन करुन प्रशासनाचा निषेध केला.

### संदिप डोंगरे याने गाजवले कुस्ती मैदान

**नगर :** तालुक्यातील विविध गावांच्या यात्रोत्सवानिमित्त झालेल्या कुस्ती हगाम्यात पैलवान संदिप डोंगरे यांनी गाजवले. उत्कृष्ट खेळ करुन डाव-प्रतिडाव करुन केलेल्या चितपट कुस्त्यांमुळे डोंगरे यांच्यावर आयोजकांसह ग्रामस्थांनी बक्षिसांचा वर्षाव केला. तर कुस्ती क्षेत्राला चालना देऊन नवोदित कुस्तीपटूंना प्रोत्साहन देण्याचे काम करणारे नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष नाना डोंगरे यांचा विविध कुस्ती हगाम्यात सन्मान करण्यात आला.

### कत्तलीसाठी चालवलेले १४ वासरांची सुटका

**नेवासा :** शहरातील नेवासा रोड परिसरात एका कारमधून तोंड बांधलेल्या अवस्थेत कत्तलीच्या उद्देशाने वासरे घेऊन जात असताना पोलिसांनी पकडली. या कारचा पाठलाग पोलीस करत असताना कारचालकाने हॉटेल योगेश जवळून राम मंदिराच्या दिशेने भरधाव वेगात हॉर्न वाजवत ही कार नेल्याने कारसमोरून मोटारसायकलवर चाललेल्या काही तरुणांना संशय आला. त्यांनी कारवाल्याला हॉर्न वाजवून देखील त्याला रस्ता दिला नाही, त्यामुळे ही कार पोलिसांना पकडण्यात मदत झाली. या कारमधील दोघांना ताब्यात घेतले असून कारमध्ये १४ गोवंशीय वासरे मिळून आली आहेत.

### शिर्डी शहरात चोरांचा सुळसुळाट

**शिर्डी :** सध्या उन्हाळी शालेय सुट्ट्या असल्याने अनेक भाविक हे शिर्डीला साई दर्शनासाठी येत आहे. शिर्डीच्या व्यावसायिकांच्या दृष्टीने भाविकांची होणारी गर्दी ही तुरळक असली तरी समाधानकारक आहे. एकीकडे विजेचा लपंडाव तर दुसरीकडे याचाच गैरफायदा घेणाऱ्या चोरांचे प्रमाण अचानक वाढल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. एकाच आठवड्यात शिर्डीतील एका महिला भाविकांचे सहा तोळ्याचे सोन्याचे गंठण शिर्डी बस स्थानकावरून चोरट्यांनी लांबविले.

### दरोड्याच्या तयारीत असलेले आरोपी जेरबंद

**श्रीगोंदा :** तालुक्यातील वेठेकरवाडी परिसरात दरोड्याचे तयारीतील असलेले तिघे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख ४७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मात्र यातील आनखी ४ व्यक्ती अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. आरोपी आदिक काळे हा सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द खुन, खुनासह दरोडा, दरोडा, घरफोडी व गंभीर दुखापत असे गंभीर स्वरुपाचे एकुण ११ गुन्हे दाखल आहेत.

# आ.जितेंद्र आव्हाड यांची पक्षातून हाकलपट्टी करावी

## ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची मागणी



**नगर : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडणाऱ्या आ.जितेंद्र आव्हाड यांचा महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे. राजकारणासाठी डॉ.आंबेडकराच्या नावाचा वापर करणाऱ्या स्टंटबाज पुढाऱ्यांची शरद पवार यांनी पक्षातून हाकलपट्टी करावी आशी मागणी त्यांनी केली.**

मंत्री विखे पाटील म्हणाले की, भावनेच्या भरात आपण काय करतो याचे भान राहीले नसलेल्या आ.जितेंद्र आव्हाड यांनी केलेले कृत्य अतिशय निंदनीय असून, डॉ आंबेडकरी विचाराच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या भावना या घटनेन दुखावल्या गेल्या आहेत.

जितेंद्र आव्हाड यांच्या सारख्या काही स्टंटबाज नेत्यांनीच राज्याचे सामाजिक राजकीय वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न मागील काही दिवसांपासून सुरू केले आहेत. राजकारणात आता जनतेचे पाठबळ मिळत नसल्याने आशी कृत्य करून प्रसिध्दी मिळविण्याचा हव्यास करताना आ.आव्हाड यांना भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा सुध्दा पुरली नाही हे अतिशय खेदजनक असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या कृत्याचा निषेध म्हणून आ.आव्हाड यांची तातडीने पक्षातून हाकलपटी केली पाहीजे आशी मागणी करून, भाररत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला आता कोणामुळे धोका आहे हे चेहरे सुध्दा आज या घटनेमुळे राज्याला समजले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# प्रवरा नदी पात्रात बुडून पंधरा वर्षीय युवकाचा मृत्यू

- राहाता तालुक्यातील कोल्हार येथील घटना
- पंधरा जणांच्या पथकाला तीन तासानंतर मृतदेह सापडला



**कोल्हार : प्रतिनिधी**

**कोल्हार येथील प्रवरा नदी पात्रात विद्यार्थी पोहण्यासाठी गेले असता यातील भगवतीपूर येथील अविनाश पाराजी जोगदंड, वय १५ या विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. ही घटना बुधवारी दुपारी घडली.**

राहाता, संगमनेर, श्रीरामपूर, शिर्डीच्या अग्नीशमन विभागाच्या बचाव पथकाने तब्बल तीन तासानंतर त्याचा शोधून प्रवरा पात्राबाहेर काढला. प्रवरा नदीत पात्रात वाळूउपसा मोठ्या प्रमाणात झाल्याने नदी पत्रात मोठंमोठे खड्डे पडले असल्याने त्या वाळूत अडकल्याने त्याचा मृतदेह सापडण्यास उशीर लागला.दरम्यान, मृत अविनाश जोगदंड हा त्याच्या मावशीकडे शिकण्यासाठी आला होता. भगवतीपूर येथील निर्मलनगर येथे तो मावशीकडे राहत होता.

राहाता तालुक्यातील कोल्हार बुद्रूक येथे बेलापूर रस्त्याला बागमळ्याजवळ असलेल्या प्रवरा नदीमध्ये भगवतीपूर परिसरातील तीन शालेय विद्यार्थी बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास पोहण्यासाठी गेले होते. त्या तिघांपैकी अविनाश पाराजी जोगदंड याने अंगातील कपडे काढून नदीप्रात्रात पोहण्यासाठी उडी घेतली. परंतु मोठमोठ्या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने तो जागीच बुडत होता. हे पाहून त्याचे मित्र गणेश रावण वक्ते व शुभम चौरसिया या मुलांनी नदीबाहेर येऊन धूम ठोकली. घटनेची माहिती वाऱ्यासारखे पसारताच कोल्हार भगवतीपूरमधील ग्रामस्थांनी तोबा गर्दी केलेली होती.

लोणी पोलिस स्टेशनला घटनेची माहिती समजताच पोलिस उपनिरीक्षक आशिष चौधरी व त्यांच्या सहकार्याची टीम तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन बचाव कार्यास मदत करण्याचे काम सुरू केले. यावेळी राहाता, संगमनेर, श्रीरामपूर व शिर्डी येथील अग्निमशन दलाच्या बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. सुमारे पंधरा जणांच्या पथकाला तब्बल तीन तासानंतर अविनाशचा मृतदेह शोधून काढण्यात यश आले. या घटनेने कोल्हार परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

(पान १ वरून)

### कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन सुटले

होते. कुकडी कालवा सल्लागार समिती व घोड प्रकल्पाच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली २० ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कुकडी प्रकल्पांतर्गत डाव्या कालव्याचे सन २०२४ च्या उन्हाळी हंगामाचे आवर्तन सद्यस्थितीमध्ये हवामानाचा व पावसाचा अंदाज घेउन शेतकऱ्यांच्या गरजेनुसार सोडण्याबाबत चर्चा झाली होती. तसे निर्देहशी अध्यक्षांनी दिले होते. याकडे लंके यांनी अधिक्षक अभियंत्यांचे लक्ष वेधले होते.

मतदार संघाचा आढावा घेतल्यानंतर पाण्याची तिव्र टंचाई निर्माण झाली असून नागरीकांना पिण्यासाठी तसेच जनावरांच्या चारा पिकासाठी पाण्याची आवष्यकता आहे. त्यासाठी तातडीने आवर्तन सुरू करण्याची शेतकरी वर्गाकडून मागणी करण्यात आली. त्या मागणीचा विचार करून आवर्तन सोडण्याबाबत लंके यांनी मागणी केली होती.

**रयत शिक्षण संस्थेचे,**
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी. मान्यता प्राप्त कृषी तंत्रनिकेतन (विना अनुदानित), जामगाव, ता. पारनेर, जि. अहमदनगर. पिन नं.४१४१०३.

## निविदा सूचना

रयत शिक्षण संस्थेचे कृषि तंत्र निकेतन जामगाव, ता. पारनेर, जि. अहमदनगर या विद्यालयाचे खालील दर्शविलेले प्रयोगशाळा साहित्य खरेदीसाठी नोंदणीकृत अनुभवी विक्रेत्यांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. न. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा साहित्य खरेदी | ४,९०,०००/- | १ महिना | ३००/- |

१) कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०५/२०२४ ते ०६/०६/२०२४ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) शाखेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. २) पूर्ण भरलेल्या निविदा दिनांक ०७/०६/२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतस्वीकारल्या जातील. ३) कामा संबंधित सर्व माहिती शाखा कार्यालयातउपलब्ध आहे. ४)एखादी निविदा नाकाराण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.५) निवीदा अर्जासोबत जोडलेल्या नियम व अटींची पूर्तता केलेली निवीदा विचारात घेतली जाईल.

दिनांक : ३०/०५/२०२४

मा.सचिव,
रयत शिक्षण संस्थाकरीत
प्राचार्य, कृषि तंत्र निकेतन, जामगाव









# हिवरे बाजारचे लोकसहभागाचे मॉडेल बेल्जिअममध्ये राबविणार

## डॉ.नाश्तासिहा गुमोचडिया यांचे प्रतिपादन



हिवरे बाजार : प्रतिनिधी

**हिवरे बाजार येथे नुकतीच बेल्जीअममधील गेमबलॉस युनिव्हर्सिटीच्या ग्रामविकास विभागातील डॉ.नाश्तासिहा गुमोचडिया भेट दिली. याप्रसंगी त्यांना पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार गावातील संपूर्ण विकास कामांची माहिती दिली.**

याप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले,हिवरे बाजारमधील लोकसहभागाचे मॉडेल बेल्जीअममध्ये राबविणार असून जागतिक तापमानबदलाचे उत्तर लोकसहभागातूनच देणे शक्य आहे.पर्यावरण व पाणी यामध्ये स्थानिकांचा सहभाग महत्वाचा आहे.तापमान बदल आणी त्यामुळे पाणी व पर्यावरण समस्या निर्माण झाल्या आहेत.२ ते ५ वर्षे टिकलेले प्रकल्प मी पाहिले परंतु हिवरे बाजारसारख्या गावाने ३५ वर्षे सातत्य पाहून हिवरे बाजारच्या स्थानिकांची भविष्याबद्दल झालेली जागृती त्यामुळेच शक्य आहे हे हिवरे बाजारला भेट दिल्यावर लक्षात येते असेही त्यांनी सांगितले.

त्यांनी भारतातील हिवरे बाजार बरोबरच पानी फौंडेशन अंतर्गत झालेल्या जलसंधारण कामांची पाहणी केली.शिवारफेरी करून जलसंधारण, कृषिविकास, वनीकरण, ग्रामीण पर्यटन केंद्र, ग्रामविकास प्रशिक्षण केंद्र इत्यादी विकास कामांची पाहणी केली.

हिवरे बाजारच्या ग्रामस्थांनी सततच्या दुष्काळाला धैर्याने पावसाचा प्रत्येक थेंब अडविला आणि भूमीत जिरविला आणि त्याचा जपून वापर केला.त्यामुळेच हिवरे बाजारचा शाश्वत विकास झाला.हिवरे बाजारला नैसर्गिक साधनसंपत्तीचे जे काम झाले ते अभूतपूर्व आहे. हिवरे बाजारमधील शाश्वत विकासाचे काम आणि सामाजिक शिस्त बेल्जीअममधील गावांचे विकासासाठी अनुकरणीय आहे.असा अभिप्राय नास्तासिहा यांनी व्यक्त केला.

# स्वामी समर्थ पालखीचे नगरमध्ये स्वागत

## पादुकांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



नगर : प्रतिनिधी

**स्वामी समर्थ पालखी परिक्रमा मध्ये पादुका विविध राज्यात फिरून त्याचे नगर मध्ये आगमन झाले कल्याणरोड ते समाधान नगर,आनंद पार्क मधील शांताई येथे पर्यंत पालखीची मिरवणूक काढण्यात आली.**

पालखीच्या स्वागत आ संग्राम जगताप,माजी महापौर अभिषेक कळमकर,स्वामी भक्त राजू ढोरे,बालकलाकार आयुष बेडेकर,दत्ता गाडलकर संदीप दातरंगे,रामभाऊ नळकांडे ,संजय गेणाप्पा, दीपक सूळ,सचिन शिंदे,जोशी सर आदी मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले, नंतर आरती व महाप्रसाद होणार संपन्न झाला तर दिवसभर याठिकाणी पादुका दर्शनाला भाविकांनी गर्दी केली होती.दुसऱ्या दिवशी सकाळी अभिषेक होऊन पादुका पुढे मार्गस्थ झाल्या

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २६ वर्षापासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे, यंदाचे २७ वे वर्ष आहे.

नगर कल्याण रोडवरील या ठिकाणी गेली १७ वर्षांपासून उत्स्फूर्त मोठ्या भक्ती भावाने स्वागत करण्यात येते न्यासाच्या वतीने अनंतकोटी ब्रम्हांड नायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी-पादुकांचे दर्शन व सेवा संबंध महाराष्ट्रासह अन्य राज्यातील गावोगावी असलेल्या स्वामी भक्तांना दर्शन करता यावे यासाठी श्री स्वामींच्या पालखी परीक्रमेचे आयोजन केले जाते .काही कारणास्तव दूरवरच्या आबाल वृद्ध, महिला स्वामी भक्तांना श्रींच्या दर्शनास्तव इच्छा असूनही स्वामींच्या मूळ स्थानी अक्कलकोट येथे येता येत नांही आशांना दर्शन देण्यासाठी व त्यांची सेवा घेण्यासाठी श्री स्वामीच त्यांच्या गावी येतात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

# गुरुदेव शिक्षण संस्थेस राज्यस्तरीय पुरस्कार

## शैक्षणिक, सामाजिक बाबींच्या निकषावर निवड

सुपा : प्रतिनिधी

**ध्येय अकॅडमी सातारा यांच्यातर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था व संस्थाचालक हा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी, पुणे येथे संपन्न झाला.**



(छाया - शरद रसाळ, सुपा)

सातारा येथील ध्येय अकॅडमी तर्फे दरवर्षी मानाचा समजला जाणारा हा एकमेव पुरस्कार यावर्षी अहमदनगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी नजीकच्या गुरुदेव शिक्षण संस्थेस सर्व शैक्षणिक व सामाजिक बाबी तपासून दिला असल्याचे ध्येय अकॅडमीचे संचालक सुदाम शेंडगे व अर्चना शेंडगे यांनी सांगितले.

हा मानाचा पुरस्कार पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांच्या शुभहस्ते ट्रॉफी, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन देण्यात आला. एकच ध्यास... विद्यार्थी विकास. हे ब्रीद वाक्य घेऊन अकॅडमीने महाराष्ट्रातील शिक्षणाची उंची वाढवण्यासाठी शैक्षणिक चळवळ सुरू केली आहे.

कुठल्याही परिस्थितीमध्ये आपला महाराष्ट्र स्पर्धा परीक्षांमध्ये पहिला आला पाहिजे हे संस्थेचे ध्येय आहे. म्हणून संस्थेने आय ॲम विनर ही स्पर्धा परीक्षा सुरू केली आहे. या स्पर्धा परीक्षेत गुरुदेव शिक्षण संस्थेतील नऊ विद्यार्थी राज्यस्तरीय यादीत व अकरा विद्यार्थी जिल्हास्तरीय यादीत झळकले आहेत. तसेच गुरुदेव शिक्षण संस्थेने विविध स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून राज्यात आपले स्थान प्राप्त केले आहे. तसेच वेगवेगळे सामाजिक उपक्रम गुरुदेव शिक्षण संस्था राबवत आहे.

संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर यांना यापूर्वी अहमदनगर जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार व महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेला आहे. शिक्षण संस्थेने पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या गुरुदेव सेमी इंग्लिश स्कूल या शाळेचा आज रोजी पट ९०० झालेला आहे. त्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कामाची दखल घेऊन राज्यात एकमेव दिला जाणारा आदर्श संस्था व आदर्श संस्थाचालक हा पुरस्कार गुरुदेव शिक्षण संस्थेस प्राप्त झाला आहे.

या पुरस्काराबाबत बोलताना संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलांना अत्यल्प फी मध्ये गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यात संस्था यशस्वी झाली आहे. यशाबद्दल पद्मभूषण अण्णा हजारे यांच्याकडून व विविध मान्यवरांकडून कौतुक केले जात आहे.

# सेनापती बापट विद्यालयाचा निकाल ८८ टक्के

## विशेष श्रेणीत १३ विद्यार्थी



कु.माळवे सिद्धी संजय 92.00%
कु.झांजाड श्रीशांत सतिश 91.20%
कु.बढे साक्षी हनुमंत 88.40%

पारनेर : प्रतिनिधी

**अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या पारनेर शहरातील सेनापती बापट विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ८८.१५ टक्के इतका लागला. विद्यालयाचे १३ विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाल्याची माहीती मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी यांनी दिली.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला. दहावीच्या परीक्षेसाठी विद्यालयाचे ७६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थी विशेष श्रेणीत, अ श्रेणीत २५, ब श्रेणीत २४, तर पास श्रेणीत ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

पारनेर शहरातील जुने विद्यालय म्हणून सेनापती बापट विद्यालयाची ओळख असून जिल्हयातील नामांकित अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या या विद्यालयाने आपला शैक्षणिक दर्जा संस्थेच्या नावलौकीकास साजेसा ठेवला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. क्रिडा क्षेत्रातही विद्यालयाचे आपले वेगळेपण जपलेले आहे. पाचवीपासून इयत्ता १२ वीच्या कला आणि शास्त्र विषयाचा अभ्यासक्रम विद्यालयात शिकविण्यात येत असून विद्यार्थी तसेच पालकांकडून या विद्यालयास पसंती देण्यात येते. दरम्यान, इयत्ता बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेचे ८३.५६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कला शाखेच्या ७७.२२ टक्के विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

### इयत्ता दहावीचे टॉपर्स

**सिध्दी संजय मावळे ९२ टक्के, श्रीशांत सतिश झंजाड ९१.२० टक्के, साक्षी हनुमंत बढे ८८.४०,वैष्णवी राजेंद्र औटी ८६.२०, ओंकार संतोष औटी ८५.८०**

### इयत्ता बारावीचे टॉपर्स

**विज्ञान शाखा - साई प्रमोद मंडलिक ८६.८३, निर्मय रावसाहेब ठुबे ७६.८३, केतकी अशोक गाडगे ७६.८३**
**कला शाखा - निशांत भरत जाधव ५८.५०, अक्षय सुनील पुजारी ५५.३३, वैष्णवी सोमनाथ हांडे ५१.३३**

# देविभोयऱ्याच्या अंबिका विद्यालयात गौरी शितोळे प्रथम

## दहावीच्या निकालाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील देविभोयरे येथील श्री अंबिका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इ १० वी.मार्च२०२४ या वर्षाचा निकाल १०० % लागला असून जनतेतून शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.**



देविभोयरे येथील आदर्श ग्रामिण विकास प्रतिष्ठान संचालित श्री अंबिका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १० वी ची विद्यार्थीनी गौरी दिनेश शितोळे ९४.००% विद्यालयात प्रथम ,अंजली अजित बेलोटे ९३.८०% गुण मिळवून विद्यालयात द्वितीय आली आहे. तृतीय क्रमांक आकांक्षा अशोक मुळे व सिद्धेश राजाराम गाडगे ९३.४० % तसेच ऋतुजा विजय बेलोटे ९३.०० % चतुर्थ क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाली आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य राजेंद्र वाघ,परंडवाल, म्हस्के, हासे, गाडीलकर,श्रीम.उके,शिंदे,बोऱ्हूडे आदींचे मार्गदर्शन लाभले.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव तसेच सर्व संचालक मंडळ व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# श्री मुलिकादेवी विद्यालयाचे ९५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील श्री मुलिकादेवी विद्या मंदीर या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९५.३० टक्के लागला. यंदाही विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली.**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये दहावीची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निघोज येथील श्री मुलीकादेवी विद्या मंदीर या विद्यालयाने घवघवीत यश संपादन केल्याबददल यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शन करणारे शिक्षक तसेच प्राचार्य यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

निघोजसारख्या कुकडी कालव्याच्या पाण्यामुळे समृध्द असलेल्या भागात श्री मुलिकादेवी विद्यालयाने आजवर अनेक विद्यार्थी घडविले असून ते विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. दहावीच्या यंदाच्या बॅचनेही घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकीकात भर घातली आहे. यशस्वी विद्यार्थी तसेच प्राचार्य अर्जुन भुजबळ व सहकारी शिक्षकांचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, सदस्य, निघोजमधील विविध संस्थांचे पदाधिकाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले.

### दृष्टीक्षेपात निकाल

**परीक्षेला बसलेले विद्यार्थी १४९, विशेष प्राविण्य ६३, प्रथम श्रेणी ४९, व्दितीय श्रेणी २९, पास श्रेणी १**

### विद्यालयातील ५ टॉपर्स

**आरती मच्छिंद्र लामखडे ९२.८०, ओंकार दिपक लामखडे ९२.६०, अमन रमजान पठाण ९१.४०,अभिषेक शशिकांत कवाद ९१, श्रेयय रंगनाथ रसाळ ९१**

# बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी शिरूरला जनजागृती!

## शिरूर वनविभागाचा उपक्रम



शिरूर : प्रतिनिधी

**शिरूर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यांचे पशुधनासह नागरिकांवर हल्ले होण्याच्या घटना घडत असल्याने शिरूर वन विभागाच्या वतीने रात्रगस्त व त्यातून शेतकरी व नागरिकांनी बिबट्या पासून संरक्षण व खबरदारी घ्यावी तसेच विविध उपायोजनांची जनजागृती करण्यात येत आहे.**

शेतकरी व नागरिकांनी देखील खबरदारी घेण्याचे आवाहन शिरूर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांच्या माध्यमातून शिरूर तालुक्यातील विविध गावात बिबट जनजागृती मोहिमेतून करण्यात येत आहे.

शिरूर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यांचे नागरिकांना दर्शन होत असल्याने परिसरात उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत असताना शिरूर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गणेश म्हेत्रे, गौरी हिंगणे, गणेश पवार यांच्या नेतृत्वाखाली वनरक्षक प्रमोद पाटील, बबन दहातोंडे, विशाल चव्हाण, संतोष भुतेकर, नारायण राठोड, लहू केसकर, चालक अभिजित सातपुते तसेच शिरूर वनविभाग रेस्क्यू टीम यांच्या माध्यमातून शिरूर तालुक्यातील वाजेवाडी, कोरेगाव भीमा, पिंपरखेड, निमगाव म्हाळुंगी, सविंदणे, आलेगाव पागा, वाघाळे, मलठण, कवठे येमाई यांसह आदी ठिकाणी रात्रगस्त सुरु करण्यात आली आहे.

गस्तीद्वारे नागरिक व शेतकऱ्यांमध्ये बिबट जनजागृती करत नागरिकांना बिबट पासून संरक्षण करण्याबाबतच्या उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे, तर नागरिकांना मार्गदर्शन करताना प्राण्यांवर बिबट्याचा हल्ला झाल्यास वनविभागाला माहिती द्यावी, शेतात काम करण्यासाठी एकट्याने जाऊ नये, शेतात घर असल्यास लहान मुलांना एकटे शाळेत पाठवू नये, सायंकाळच्या सुमारास मुलांना एकटे बाहेर सोडू नये, गोठा बंदिस्त ठेवावा, घराबाहेर व गोठ्यात उजेड ठेवावा, उसाच्या शेतालगत गुरे चरायला नेऊ नये, शेतात काम करताना आवाज करावा, मोबाईल वर गाणी लावावीत यांसह आदी आवाहन वनविभागाच्या वतीने शेतकरी व नागरिकांना करण्यात आले आहे.

### वन्य प्राण्यांना विनाकारण डिवचू देऊ नका

**वन्य जीव राष्ट्रीय संपत्ती आहे, विनाकारण वन्य प्राण्यांना डिवचू नका, वन्य प्राणी आपले शत्रू नाहीत, बिबट्या भारतात फक्त आपल्या भागात आहेत त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असल्याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे.बिबट्याने पशुधन ठार मारल्यास १५ हजार नुकसान भरपाई, मनुष्य जखमी झाल्यास उपचारासाठी २० हजार, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार, इसम मृत झाल्यास २० लाख पर्यंत मदत शासनाकडून करण्यात येत असते.**

प्रताप जगताप
वनपरीक्षेत्र अधिकारी शिरूर

# बहिरोबावाडीत राष्ट्रीय महापुरुषांची संयुक्त जयंती साजरी

## प्रा.प्रशांत जाधव यांचे व्याख्यान

पारनेर : प्रतिनिधी

**तालुक्यातील बहिरोबावाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज, तथागत गौतम बुद्ध , महात्मा ज्योतिबा फुले,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्रीय महापुरुषांची संयुक्त जयंती प्रबुद्ध सेवा समितीच्या वतीने नुकतीच साजरी करण्यात आली.**




या वेळी प्रमुख व्याख्याते प्रा.प्रशांत चव्हाण सर यांनी राष्ट्रीय महापुरुषांचे सामाजिक कार्य व जीवनचरित्र यावर विस्तृत प्रबोधन करत महापुरुषांनी समाजासाठी मोठे योगदान दिल्यानेच आज समाज सुशिक्षित , समृद्ध व सुसंस्कृत झालेला आहे.परंतु सध्याच्या युगात समाजाला मात्र राष्ट्रीय महापुरुषांच्या कार्याचा व विचारांचा विसर पडला असुन, समाजाच्या उन्नतीसाठी व राष्ट्र उभारणीसाठी महापुरुषांचेच विचार तारणहार ठरतील त्यामुळे सर्वांनी त्यांचे विचार आत्मसात करावेत.

या वेळी शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकत बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या मनुस्मृती चे दहन महाड येथे १९२७ ला केले त्याच मनू स्मृतीचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असुन हे अतिशय दुर्देवी असुन,सध्याची देशातील व राज्यातील स्थिती अतिशय विदारक असुन , साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची " हि न्यायव्यवस्था काहिकांची रखेल झाली.हि संसद ही हिजड्यांची हवेली झाली.मी माझ्या व्यथा मांडू कुणाकडे कारण हि न्यायपालिका भ्रष्टतेने रंगीन झाली. हि कविता सध्याच्या स्थितीला तंतोतंत लागू पडत असल्याचे सांगितले.

या प्रसंगी माजी अधिकारी विठ्ठल देठे पाटील,खादी ग्रामोद्योगचे व्हा.चेअरमन राजेंद्र करंदीकर,उद्योजक संभाजी देठे पाटील, सामाजिक कार्यकर्ते संपत पवार, डॉ.गुलाब पवार, मधुकर पवार सर, बाजीराव पवार सर , शाहिर साहेबराव पवार , सुनिल पवार ,संजय मोरे , किरण पवार , किरण सोनवने,शिवाजी देठे , विजय पवार , सुनील बर्वे , छगन भांबरे, बाबाजी व्यवहारे , यशवंत व्यवहारे ,शंकर व्यवहारे ,बाळू शिंदे, बापू व्यवहारे, रामदास साळवे ,सुरेश गायकवाड ,बाजीराव पवार,प्रविण पवार,मोतीराम पवार व तालुक्यातील विविध परिवर्तनवादी संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com